# २६ व्या विस्तार शिक्षण परिषद बैठकीचा इतिवृतांत

विस्तार शिक्षण परिषदेची २६ वी बैठक दि २९ मे, २०१८ रोजी सकाळी ११.०० वा कृषि जागर सभागृह, शेतकरी सदन, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला येथे आयोजित करण्यात आली. या सभेस उपस्थित असलेल्या सभासदांची यादी **प्रपत्र-१** वर देण्यात आली आहे. मा. डॉ. व्ही. एम. भाले, कुलगुरु, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या सभेचा सविस्तर ईतिवृत्तांत खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

सभेच्या सुरुवातीला सन्मानिय अध्यक्ष, तसेच व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन संचालक विस्तार शिक्षण तथा सदस्य सचिव यांनी स्वागत केले व तदद्वतच अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने सभेची कार्यवाही सुरु केली. विषय पत्रिका टिप्पणी नुसार दि. ०२ जून, २०१७ रोजी पार पडलेल्या २५ व्या विस्तार शिक्षण परिषद बैठकीचे इतिवृत्त, बैठकीमध्ये घेण्यात आलेले निर्णय व निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचे वाचन करण्यात आले व त्यास सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

प्रा. एस. पी. सलामे, प्रमुख संपादक यांनी सन २०१७-१८ मध्ये आयोजित विस्तार शिक्षण कार्यक्रमाबाबतचे तसेच सन २०१८-१९ मध्ये प्रस्तावित विस्तार शिक्षण कार्यक्रमांचे सविस्तर सादरीकरण केले व सभागृहाने त्यास मान्यता दिली. या सभेमध्ये काही विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | विद्यापीठ सुवर्ण जयंती वर्षाची सुरवात शिवार फेरी या कार्यक्रमापासुन होणार असल्यामुळे खरीप हंगामाच्या सुरुवातीपासुनच शिवार फेरीचे नियोजन करण्यात यावे. | • संचालक विस्तार शिक्षण (मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी)<br>• सर्व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ व संबंधीत विभाग |
| २ | विद्यापीठाच्या तांत्रिक सहकार्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट होऊन यश संपादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या यशोगाथाचे संकलन करुन प्रकाशित करण्यात यावे. | • संचालक विस्तार शिक्षण (प्रमुख संपादक)<br>• सर्व कृषि विज्ञान केंद्रे<br>• सर्व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ |
| ३ | कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र येथील दुरध्वनी मार्गदर्शन सेवेचा लाभ अधिक शेतकऱ्यांना घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. | व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र |
| ४ | विद्यापीठास भेट देणाऱ्या शेतकऱ्याची नोंद नियमीतपणे करण्यात यावी. | • व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र<br>• डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती केंद्र |
| ५ | विस्तार शिक्षण संचालनालयाद्वारे निर्मित मोबाईल ॲपला प्रसिध्दी देण्यात यावी व ॲप डाऊनलोड करणाऱ्या शेतकऱ्यांची नोंद करण्यात यावी. | विस्तार प्रशिक्षण अधिकारी, विस्तार शिक्षण संचालनालय |
| ६ | उन्नत शेती - समृध्द शेतकरी अभियानामध्ये विद्यापीठाने घेतलेल्या सहभागाविषयीचा अहवाल तयार करण्यात यावा. | विस्तार कृषि विद्यावेत्ता, विस्तार शिक्षण संचालनालय |

| | | |
|---|---|---|
| ७ | कृषि पत्रिका मासिकामध्ये प्रकाशित लेखांपैकी उत्कृष्ठ लेखास ॲग्रोटेक मध्ये पुरस्कार करण्यात यावे. | प्रमुख संपादक, विस्तार शिक्षण संचालनालय |
| ८ | विभागीय कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही, जि. चंद्रपुर येथील प्रक्षेत्रावर शिवार फेरीचे आयोजन करण्यात यावे. | • सहयोगी संचालक संशोधन, सिंदेवाही<br>• कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, सिंदेवाही, जि. चंद्रपुर |
| ९ | विद्यापीठस्तरावर आयोजित सर्व विस्तार शिक्षण उपक्रमाचा समावेश विस्तार शिक्षण परिषदेच्या अहवालात करण्यात यावा. | मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी, विस्तार शिक्षण संचालनालय |
| १० | कपाशीवरील शेंदरी बोंडअळी निर्मुलनासाठी विशेष अभियान राबवावे व अहवाल तयार करण्यात यावा. | विस्तार कृषि विद्यावेत्ता, विस्तार शिक्षण संचालनालय |
| ११ | कपाशीवरील शेंदरी बोंडअळी निर्मुलनासाठी प्रकल्प अहवाल तयार करून आर्थिक प्राप्तीसाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेस सादर करण्यात यावा. | व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र |
| १२ | विद्यापीठा अंतर्गत कार्यरत असणाऱ्या कृषि तंत्रज्ञान शाळेतील विद्यार्थीद्वारे तंत्रज्ञान प्रसाराचे कार्य करावे व अहवाल तयार करण्यात यावा. | विस्तार कृषि विद्यावेत्ता व मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी, विस्तार शिक्षण संचालनालय, सर्व प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय |
| १३ | ग्रामीणस्तरावर कार्य करणाऱ्या कृषि विभागाच्या अधिकारी / कर्मचारी यांना सन्मानीत करणे बाबतचे पत्र विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती व नापूर विभाग, नागपूर यांना पाठविण्यात यावे. | मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी, विस्तार शिक्षण संचालनालय |

सभेच्या शेवटी अध्यक्ष महोदयांनी विस्तार शिक्षण संचालनालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रम आयोजनाबाबत व विस्तार शिक्षण कार्यक्रम अधिक प्रभावी होण्याच्या दृष्टीने सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

डॉ. एम. एस. खाकरे, विस्तार कृषि विद्यावेत्ता यांनी सभेचे संचालन तर डॉ. के. टी. लहरीया, विस्तार प्रशिक्षण अधिकारी यांनी आभार प्रदर्शन केले.

संचालक विस्तार शिक्षण

अध्यक्ष
विस्तार शिक्षण परिषद तथा
कुलगुरू, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला